# संपादकीय

## शहानीती आणि सारवासारव!

जसजशा गुजरात आणि उत्तर प्रदेशातील निवडणुका जवळ येत आहेत तसतसे राजकीय वातावरण गढूळ होत आहे. आरोप प्रत्यारोपाच्या फैरी आतापासूनच सुरू झाल्या आहेत. महत्त्वाचे म्हणजे स्थानिक राजकारणानेही जोर घेतला आहे. गेल्या काही दिवसांत दलित आणि इतरेतर समाजात सध्याच्या सरकारच्या बाबत असंतोष निर्माण करण्याचे काम विरोधकांनी चांगलेच केले आहे. अर्थात त्याला सध्याचे केंद्र सरकारही तितकेच जबाबदार आहे. सध्या केंद्रात किंवा कोणत्याही राज्यात दोन सत्ताकेंद्रे आहेत. त्यात प्रामुख्याने अमित शहा आणि नरेंद्र मोदी ही ती सत्ता केंद्रे आहेत. ज्या काही रणनीती ठरतात त्या अमित शहा आणि मोदीच ठरवत असल्याचे यापूर्वीच्या अनेक निवडणुकांतून स्पष्ट झाले आहे. मग ती निवडणूक महाराष्ट्रातील असो अथवा लोकसभेची किंवा दिल्लीची असो किंवा बिहारची. कुठे यश तर कुठे अपयश. असो... दिल्ली आणि बिहारच्या पराभवाने त्यांच्या या कुटनीतीला थोडा लगाम लागला होता. मात्र पुन्हा एकदा पहिल्यांदाच आसामसारख्या राज्यात यश मिळवल्याने त्यांच्या कुटनीतीचा बोलबाला सुरू झाला आहे. आता या द्वयींकडे उत्तर प्रदेश आणि गुजरात या दोन राज्यांच्या निवडणुकांचे मोठे आव्हान उभे राहिले आहे. त्याला ते सामोरे कसे जातात. त्यांच्या गुजरातच्या बाबत बोलायचे झाले तर हे त्यांचे होमपीच. परंतु तिथेच अनेक स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये भाजपाला मात खावी लागली आहे. शिवाय नुकत्याच अशा काही घटना घडल्या आहेत की भाजपाला पुन्हा तिथे निवडून येणे खूपच कठीण झाले आहे. त्यातच राष्ट्रीय स्वयंसेवक संघाने घेतलेल्या सर्वेक्षणात भाजप तोंडघशी पडणार असेच चित्र आहे. मोदींचे कणखर नेतृत्व गुजरातला लाभल्यामुळे ते चारदा मुख्यमंत्री होऊ शकले. मात्र त्यापूर्वी असा भीम पराक्रम करणारा कुणीही नेता गुजरातमध्ये नव्हता, हे विशेष. आनंदी बेन पटेल यांच्या रुपाने त्यांनी आपला पर्याय देण्याचा प्रयत्न केला खरा... परंतु त्यात त्यांना यश आले नाही. शेवटी आनंदीबेन यांना पायउतार व्हावे लागले. त्या जागी नितीन पटेल या पटेल बहुल समाजाचा नेता मुख्यमंत्री होईल असे वातावरण झाले होते. अगदी नितीन पटेलही तशाच प्रकारे मुलाखती देत होते. मात्र अचानक सूत्रे बदलली आणि बटेल बाजूला राहिले आणि विजय रुपानी या बिगर पटेल समाजाचा नेता मुख्यमंत्री झाला. अर्थात नितीन पटेल यांची उपमुख्यमंत्रीपदी निवड केली आहे. अमित शहा नेहमीच धक्कातंत्र वापरत आले आहेत. महाराष्ट्रात मराठाबहुल समाज असतानाही बिगर मराठा मुख्यमंत्री देऊन सर्वांनाच चकीत केले होते. शिवाय महाराष्ट्राचे मुख्यमंत्रीही तसे फार अनुभवी नव्हते. हरियाणातही त्यांनी बिगर जाट मुख्यमंत्री दिला तर गुजरातमध्येही त्यांनी तोच फंडा वापरला. अर्थात त्यांना अनुभवापेक्षा काम करणारा मुख्यमंत्री हवा आहे. शिवाय त्यांच्या मर्जीतलाही हवा आहे. कारण अनेकदा उच्च पदावर गेल्यावर त्यांना पंख फुटू लागतात आणि पक्षनेतृत्वाला बेदखल करतात, असा अनुभव त्यांना बहुतेक असावा. त्यांना गुजरातमध्ये जी पडझड झाली आहे ती सावरायची आहे आणि त्यासाठी कमी कालावधी बाकी आहे. आनंदीबेन आणि अमित शहा यांच्यातील मतभेद कधीच चव्हाट्यावर आले आहेत. मात्र आता पटेल समाजाला डावलून त्यांनी मुख्यमंत्रीपद बिगर पटेल समाजाला दिले असले तरी त्यांनी पटेल समाजाचे चक्क आठ मंत्री केले आहेत. त्यामुळे २० टक्के पटेल समाजाला शांत करण्यात त्यांना सध्या तरी यश आले आहे असे म्हणता येईल. मात्र तरीही आव्हान कायमच राहिले आहे. दुसरीकडे उनामध्ये झालेल्या दलितांच्या मारझोडीमुळेही भाजपाला मोठे नुकसान सहन करावे लागणार आहे. हे लक्षात येताच कधीही काहीही न बोलणारे मोदी आता प्रकटपणे बोलू लागले आहे. त्यांनी दलितांची कड घेताना लागोपाठ दोन सभांमध्ये दलितांची बाजू घेताना त्यांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी त्यांच्यावर कोणतेच अन्याय होता नये. असे अन्याय सहन केले जाणार नाहीत. त्यांना मारायचेच असेल तर अगोदर माझ्यावर गोळ्या झाडा, असेही त्यांनी सांगितले. एकूणच मोदी यांनी आपण 'सबका साथ सबका विकास' हा नारा पुन्हा देत आहेत. मात्र त्यांचे हे वक्तव्ये म्हणजे सारवासारव असल्याचा आरोप विरोधकांनी केला आहे. मायवती आणि एमआयएमचे अस्सुद्दीन ओवेसी यांनी केवळ बोलून उपयोगाचे नाही तर ते कृतीत दिसले पाहिजे असे सांगितले. खरे तर मोदी निवडणूक तोंडावर येण्याची वाट पाहत होते काय? असा प्रश्न उभा राहिला आहे. दलितांवर आजही अन्याय होतो आहे आणि हे सरकार मात्र काहीच करीत नाही, असाच संदेश दिला आहे. मोदी नेहमीच मूग गिळून का गप्प बसतात? हेच कळत नाही. मोदी यांनी पूर्वीच्या यूपीए सरकारमधील डॉ. मनमोहन सिंग हे कसे गप्प राहणारे पंतप्रधान आहेत हे जाहीर सभांमधून सांगत होते. परंतु आता मोदीही कोणत्या कारणासाठी गप्प बसतात? त्यांना कोण रोखते? खरे तर दलितांवर त्यांच्या देखत अन्याय होत आहे. मात्र त्यांना हिंदुत्वाचा एकमेव अजेंडा चालवायचा आहे आणि म्हणूनच हिंदुत्ववादी काही लोक मोकाट झाले आहेत आणि तरीही ते रोखू शकत नाहीत? याचे आश्चर्य वाटते. खरे तर हिंदुत्व ज्यांना जोपासायचे आहे त्यांनी ते नक्की जोपासले पाहिजे. तो त्यांचा अधिकार आहे. मात्र त्यासाठी दुसऱ्यांवर अन्याय कशासाठी? तेच कळत नाही. प्रत्येकाला आपली जात आणि आपला धर्म जोपासायला काहीच हरकत नाही. मात्र त्यासाठी दुसऱ्या जाती धर्माला त्रास देण्याचा हेतू काय? आपण किती प्रबळ आहोत हे जगाला दाखवायचे आहे काय? खरे तर त्यामुळे प्रबळ नाही परंतु किती दुर्बळ आहोत हेच त्यातून स्पष्ट होते. मोदी यांना या साऱ्या प्रकरणांचा भविष्यातील दोन राज्यांच्या निवडणुकांत मोठ्या प्रमाणावर परिणाम होणार हे कळून चुकले आहे आणि त्यासाठीच त्यांनी ही दलितांची कड घेण्यास सुरुवात केली आहे. यात त्यांचा कळवळा कमी आणि अगतिकताच जास्त दिसून येत आहे. खरे तर मोदी यांनी हे प्रकरण घडले तेव्हाच त्या त्या वेळी आपले भाष्य देऊन या समाजकंटकांना वेळीच बंधन घातले पाहिजे होते. परंतु त्यांनी त्यांना आवरायचे सोडून त्यांना मोकाट सोडले आणि त्याचा जो काही परिणाम व्हायचा तो झाला. भाजपाची आणि केंद्र सरकारची जी बदनामी व्हायची ती झालीच. मोदी सरकार कसे दलित विरोधी आहे याचा पुरेपूर प्रचार विरोधकांनी केला. त्यातच मायावतींनी तर दलितांबरोबरच महिला विरोधी हे सरकार असल्याचा आरोप केला होता. एकूणच मोदी आणि अमित शहा यांना मोठी कसरत करावी लागणार आहे. त्यांना आता ज्या चुका झाल्या आहेत त्या सुधारण्यासाठी प्रयत्न करावे लागणार आहेत. त्यासाठीच अमित शहा यांनी गुजरातमध्ये गडाची डागडुजी करायला सुरुवात केली आहे तर मोदी यांनीही बिघडलेल्या गोष्टी सुधारण्यासाठी प्रयत्न चालवले आहेत. परंतु उशिराचे शहाणपण राजकारणात किती उपयोगी पडते ते निकालानंतरच लक्षात येईल. मात्र अमित शहा ये बूथ लेवलवर काम करणारे म्हणून ओळखले जातात. त्यांनी लोकसभेच्या निवडणुकीत आणि इतर निवडणुकीत आपला करिष्मा दाखवला आहे. मात्र आता त्यांचा खरा कस लागणार आहे. आता मोदी आणि शहा यांची नीती आणि डागडुजी किती उपयोगी पडते ते कळेलच!

---

## गुजरातमधील बदल

**-: मनोहर सप्रे :-**

एकेकाळी काँग्रेसचा बालेकिल्ला असलेले गुजरात काँग्रेसच्या हातातून कधी गेले, हे काँग्रेसलाच कळले नाही. आता काही ठिकाणी विजय मिळाल्यामुळे राज्याचे वातावरण बदलले, अशी काँग्रेसची कल्पना आहे, असे दिसते. त्याचवेळी आम आदमी पक्षही गुजरातमध्ये पोहण्याचा प्रयत्न करीत असून, आपल्या आंदोलकांना त्यांनी राज्यभर सोडले आहे. परंतु नेतृत्वाचा प्रश्न ज्यावेळी येतो, त्यावेळी राज्यभरात प्रभाव असलेल्या नेत्याचे महत्त्व वाढते. काँग्रेसकडे शंकरसिंह वाघेला यांच्याशिवाय मोठा नेता नाही. दुसरे काही नेते प्रयत्न करीत आहेत; परंतु अनेकांना दिल्लीच्या राजकारणातच राहण्यात आनंद आहे. अहमद पटेल यांच्यासारखा नेता सोनिया गांधी आणि राहुल गांधी यांना सल्ला देण्याचे काम करीत असून, त्यांनाही राज्यामध्ये येऊन आपली ताकद दाखविण्याची इच्छा नाही.



गुजरामध्ये आनंदीबेन पटेल यांच्या सरकारचा समारोप होऊन विजय रुपानी यांच्या नेतृत्वाखाली नवे सरकार सत्तेवर आले आहे. गुजरातमध्ये दलितांवर झालेले अत्याचार आणि काही भागांत काँग्रेस पक्षाला स्थानिक ठिकाणी निवडणुकीत मिळालेले यश यामुळे आता भाजपचे काही खरे नाही, असे अनेकांना वाटले होते. मात्र, गेली १५ वर्षे गुजरातमध्ये राज्य करणाऱ्या भाजपच्या नेत्यांना राज्याचे गणित व्यवस्थित माहीत आहे. जबरदस्त राजकारण खेळणारे अमित शहा यांच्याकडे राज्याच्या नव्या मुख्यमंत्र्यांची निवड करण्याची जबाबदारी होती. त्यांनी अल्पसंख्य जैन समाजाचे असलेले विजय रुपानी यांना मुख्यमंत्रीपद दिल्यामुळे अनेकांच्या भुवया उंचावल्या. मात्र, शहा यांचे डावपेच अनेकांच्या लक्षातही आले नाहीत. भाजपला यापूर्वी जबरदस्त पाठिंबा देणाऱ्या पटेल समाजाचे नितीन पटेल यांच्याकडे मुख्यमंत्रीपद जाईल, अशी आधी अपेक्षा होती; परंतु बहुसंख्य समाजाला त्यांनी केलेल्या आंदोलनामुळे मुख्यमंत्रीपद मिळाले, असे होऊन इतर समाज नाराज होतील आणि ते भाजपच्या विरोधात जातील, हे शहा यांचे गणित पक्के होते. मुळात नरेंद्र मोदी यांनी गुजरातमध्ये बारा वर्षे सरकार चालवले आणि प्रत्येक वेळी बहुमतात आले. मात्र, मोदी हेदेखील राज्यात बहुसंख्य समाजाचे नाहीत. असे असूनही विकासाच्या मुद्द्यावर गुजरातच्या जनतेने भाजपला वारंवार निवडून दिले. एकेकाळी काँग्रेसचा बालेकिल्ला असलेले गुजरात काँग्रेसच्या हातातून कधी गेले, हे काँग्रेसलाच कळले नाही. आता काही ठिकाणी विजय मिळाल्यामुळे राज्याचे वातावरण बदलले, अशी काँग्रेसची कल्पना आहे, असे दिसते. त्याचवेळी आम आदमी पक्षही गुजरातमध्ये पोहण्याचा प्रयत्न करीत असून, आपल्या आंदोलकांना त्यांनी राज्यभर सोडले आहे. परंतु नेतृत्वाचा प्रश्न ज्यावेळी येतो, त्यावेळी राज्यभरात प्रभाव असलेल्या नेत्याचे महत्त्व वाढते. काँग्रेसकडे शंकरसिंह वाघेला यांच्याशिवाय मोठा नेता नाही. दुसरे काही नेते प्रयत्न करीत आहेत; परंतु अनेकांना दिल्लीच्या राजकारणातच राहण्यात आनंद आहे. अहमद पटेल यांच्यासारखा नेता सोनिया गांधी आणि राहुल गांधी यांना सल्ला देण्याचे काम करीत असून, त्यांनाही राज्यामध्ये येऊन आपली ताकद दाखविण्याची इच्छा नाही. अशा परिस्थितीत भाजपचे सरकार आगामी निवडणुकीत आपोआप पराभूत होईल, अशी काँग्रेसची कल्पना असावी; परंतु संघटनात्मक पातळीवर काँग्रेसची अवस्था जशी देशात आहे, तशीच ती गुजरातमध्येही आहे. नुकत्याच झालेल्या दलित अत्याचार प्रकरणामुळे भाजप लोकप्रिय राहणार नाही, असेही काँग्रेसच्या नेत्यांना वाटत आहे. अशा वेळी पटेल समाजाला उपमुख्यमंत्रीपद देऊन आगामी निवडणुकीत पाठिंबा द्या, अशा प्रकारची अटच अमित शहा यांनी त्यांच्यापुढे ठेवली आहे, असे दिसते. भारतीय राजकारण जातीच्या गणितावर चालत असल्यामुळे आणि हे गणित अमित शहा पक्के ठाऊक असल्यामुळे भाजपची घसरण त्यांनी एका झटक्यामध्ये थांबवली आहे, असे दिसते. हे डावपेच काँग्रेसच्याही लक्षात आले नाहीत. आनंदीबेन पटेल यांच्या कन्येच्या कंपनीला शेकडो एकर जमीन देण्यात आली, अशा प्रकारचा आरोप झाला आणि त्या आरोपावर काँग्रेसने आपल्या प्रचाराची भिंत उभारली होती; परंतु शहा यांनी निर्माण केलेल्या वादळामध्ये ही भिंत कोसळली आहे. भाजप हा जबरदस्त राजकारण खेळणारा पक्ष असून, हा पक्ष आपोआप अपयशी होईल आणि मग आपणच आहोत, अशा प्रकारची कल्पना काँग्रेसने सोडून द्यायला हवी. सरकारच्या अपयशावर विरोधी पक्षाचे यश ठरत नाही. त्यामुळे काँग्रेसला स्वत:चे काही तरी करावे लागेल आणि गुजरातमध्ये गेलेली ताकद परत मिळवण्यासाठी बरेच काही करावे लागेल, असे दिसते.

---

## तूच आहेस तुझ्या जीवनाचा शिल्पकार

### जीवनविद्येचा ओनामा



**लेखक : सद्गुरू श्री. वामनराव पै**

वीज (Electricity) म्हणजे प्रत्यक्षात काय आहे हे कोणीही सांगू शकत नाही. परंतु विजेचे परिणाम सांगता येतात. त्याचप्रमाणे मायेचा वरील प्रकार आहे.

थोडक्यात, स्वस्वरूपात स्फुरण पावत असताना शिवाला आपल्या शुद्ध स्वरूपाचा विसर पडतो व तो आपल्या 'परमात्मा' या उच्च पदावरून जो कोसळतो तो 'जीवात्मा' या पदावर येऊन आदळतो. या अवस्थेत जीव उपाधीशी म्हणजेच शरीराशी एकरूप होऊन रहातो. शरीराशी एकरूप होऊन रहाणे हा जीवाचा स्वभावच होतो व जन्मोजन्मी या स्वभावालाच तो चिकटून रहातो. म्हणूनच तुकाराम महाराज सांगतात–

**किती वेळा जन्मा यावे। किती व्हावे फजित।।**

भ्रमाचा भोपळा घेऊन जीव जन्माला येतो व भ्रमाचा भोपळा घेऊनच तो इहलोक सोडून जातो. याच संदर्भात तुकाराम महाराज सांगतात–

**तुका म्हणे होती। तुझी माझी एक ज्योती।।**

केव्हा तरी भूतकाळात 'आरंभी' जीव व देव अशा दोन ज्योती नव्हत्याच. तेव्हा हाती फक्त एकच ज्योती. परंतु मायेच्या विलक्षण प्रभावाने म्हणजेच कल्पनेच्या आहारी जाऊन देवापासून जीव विभक्त झाला व 'आता' जीव व देव अशा दोन ज्योती कल्पनेत मूर्त झाल्या.

या दोन ज्योतींना "खरा मी" किंवा "Real ego and false ego" किंवा "शुद्ध अहंकार व अशुद्ध अहंकार" असे म्हणतात. परंतु वर म्हटल्याप्रमाणे "खरा मी" नांदत आहे तो "खोटा मी" किंवा "अशुद्ध अहंकार" असून त्यालाच चित्–जड ग्रंथी असे म्हणतात. ही ग्रंथी मोठी विलक्षण आहे. **क्रमशः**

---

**।। श्रीगुरूदेवदत्त प्रसन्न ।।**

श्रीकृष्णानंद दत्तपीठ – दादर (पश्चिम), मुंबई – २८.



## ।।स्वानंद चरित्र।।

### अध्याय सहावा

**श्रीकृष्णानंदस्वामी विरचित**

प्रभूअवस्थेचे ऐसे आगळेपण। संवादातून जे केले आम्ही वर्णन। त्याची प्रचिती आली आम्हा दुपारच्या कार्यक्रमातून। तेणे संवादाचे त्या विशेषचि स्थान जाणवले आम्हा ।।३०४।।

नंतर चार वाजता गुरुपौर्णिमा सोहळा सुरु झाला। भक्तानी केले पदगायन अन भावपूर्ण भाषणाला। तो म्हणता म्हणता वेळ एव्हढा गेला। की सात कधी वाजले कुणाला कळले ना ते ।।३०५।।

त्यावेळी आधीच्या योजनेप्रमाणे। स्वानंद चरित्राच्या तिसऱ्या अध्यायाचे। ठरविले होते प्रकाशन करण्याचे। प्रभूंच्याच हस्ते मंगलदायी ।।३०६।।

त्यासाठी प्रभूंच्या निष्ठावंत भक्त सौ. शकूताई। सादर झाल्या प्रभूंस विनंती करण्यासाठी। की प्रभूनी करावे आता अध्याय प्रकाशनासी। अन प्रती द्याव्या भक्तांसी प्रसाद म्हणून ।।३०७।।

**क्रमशः**

---

## चिन्यांची अशीही मुजोरी

वाचक पत्र

**- ओमकार बेंद्रे, मीरा रोड, ठाणे.**

गुप्तचर यंत्रणांनी संशय व्यक्त केल्यावर चीनच्या तीन पत्रकारांची हकालपट्टी करण्यात आली आहे.तसेच ते तिघे व्हिसाची मुदत संपल्यावरही भारतात रहात होते.या पत्रकारांच्या हकालपट्टीची दोन्हीही कारणे लक्षवेधी आहेत.यांची तर कसून चौकशी होत यांना तुरुंगात डांबून ठेऊन मगच चीनमध्ये गच्छंती करायला हवी. चीनच्या पत्रकारांनी नियमबाह्य वर्तन करूनही भारताने त्यांच्यावर अगदीच सौम्य कारवाई केली आहे.शत्रू देश चीन याबद्दल थयथयाट करण्याची शक्यता नाकारता येत नाही.नियमांचे उल्लंघन करणे ही चीनची शिकवणच आहे असे वाटते. कारण अरुणाचल प्रदेश राज्यामध्ये चिनी सैन्य भारतीय सीमेत नेहमीच घुसखोरी करण्याच्या सिद्धतेत असते. पण भारतीय सैन्य त्यांचा तो बेत उधळून लावत आले आहे. चिन्यांना जशास तसे उत्तर दिले तरच ते त्यांना चटकन कळते व लक्षातही रहाते.मैत्री करण्याच्या नावाखाली ज्या देशात आपण रहातो तेथील नियमांचे उल्लंघन केल्यास कसे काय चालवून घ्यायचे? चिनी पत्रकारांसारखे गैरवर्तन अन्य कोणत्याही देशाच्या पत्रकारांकडून होत नाही याकडेही लक्ष दिले पाहिजे. व्हिसा संपल्यावरही भारतात रहाता येण्याबद्दल कठोर नियम असण्याची गरज येथे अधोरेखित होत आहे.

---

## चहूदिशांनी फिरणारे शिवलिंग



सध्या श्रावण महिना सुरू आहे. या काळात भाविकांची शंकराच्या दर्शनासाठी मंदिरात गर्दी होत असते. भारतात शेकड्यांनी शिवालये आहेत. प्रत्येकाचे कांही ना कांही खास वैशिष्ठही आहे. मध्यप्रदेशातील शोपूर किंवा मुळचे शिवपूर येथील गोविंदेश्वर महादेव नावाचे मंदिर असेच वैशिष्ठपूर्ण आहे. असे सांगितले जाते की, या मंदिरातील शिवलिंग प्रथम महाराष्ट्रातील सोलापूर येथे बांबेश्वर महादेव या नावाने मंदिरात स्थापन केलेले होते. मात्र नंतर ते शिवभक्त गौड राजा पुरुषोत्तमदास याने १७२२ साली शिवपूर नगर वसवून तेथील मंदिरात प्राणप्रतिष्ठा करून बसविले. असा उल्लेख या मंदिरातील शिलालेखावर केला आहे.

या शिवलिंगाचे वैशिष्ठ म्हणजे हे शिवलिंग चारीबाजूंनी फिरू शकते. सर्वसाधारणपणे शिवलिंगांची स्थापना दक्षिणोत्तर दिशेने केलेली असते. मात्र हे शिवलिंग भाविकांच्या सोयीनुसार कोणत्याही दिशेने फिरविता येते. लाल पत्थरातील या शिवलिंगाचे दोन भाग आहेत. एक पिंडी व दुसरी जलहरी. एका मोठ्या दगडात खळगा करून त्यात हे शिवलिंग बसविले गेले आहे. या ठिकाणीही श्रावणात व दर सोमवारी शिवभक्तांची मोठी गर्दी होत असते.

---


बैंक ऑफ इंडिया Bank of India BOI
Relationships beyond banking

**साकीनाका शाखा:** सागर–टेक प्लाझा, बी विंग, अंधेरी–कुर्ला रोड, अंधेरी (पूर्व), मुंबई–४०००७२. **दूर.:**२८५१५०१६, २८५९५०१७ **फॅक्स:** २८५१५९०५
**ई–मेल:** sakinaka.mumbainorth@bankofindia.co.in

**ताबा सूचना**

**(नियम ८(१))** **(स्थावर मालमत्तेकरिता)**

ज्याअर्थी, खालील स्वाक्षरीकर्ता हे सिक्युरीटायझेशन अ‍ॅन्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फिनान्शियल अ‍ॅसेटस् अ‍ॅन्ड एनफोर्समेन्ट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट अ‍ॅक्ट २००२ अंतर्गत बँक ऑफ इंडियाचे प्राधिकृत अधिकारी आहेत आणि सिक्युरिटी इंटरेस्ट (एनफोर्समेन्ट) रूल्स, २००२ च्या नियम ३ सहवाचिता कलम १३(१२) अन्वये असलेल्या अधिकाराअंतर्गत त्यांनी ०१.०४.२०१६ रोजी वितरीत केलेल्या मागणी सूचनेनुसार कर्जदार/जामिनदार **मे. मल्टिकेम इंडस्ट्रीज, श्री.प्रमोद केशीओ पाठक (मालक), श्रीमती वैशाली प्रमोद पाठक, श्री. सुनिल राजमणी पाठक** यांना सदर सूचनेच्या तारखेपासून ६० दिवसांच्या आत रक्कम **रू.१,०५,३९,३३७.७६ (रूपये एक कोटी पाच लाख एकोणचाळीस हजार तीनशे सदतीस आणि पैसे शहाहत्तर फक्त)** जमा करण्यास सांगण्यात आले होते.

कर्जदार/जामिनदार यांनी वर नमूद केलेली रक्कम भरण्यास असमर्थ ठरले असून कर्जदार/जामिनदार व सर्वसामान्य जनतेस येथे सूचित करण्यात येत आहे की, खालील स्वाक्षरीकर्त्यांनी सदर कायद्याच्या कलम १३(४) सहवाचिता सदर अधिनियमाच्या नियम ८ अन्वये त्यांना प्राप्त असलेल्या अधिकाराअंतर्गत खाली नमूद केलेल्या मालमत्तेचा सांकेतिक ताबा **२ ऑगस्ट, २०१६** रोजी घेतलेला आहे.

विशेषतः कर्जदार/प्रतिभूत ऋणको व सर्वसामान्य जनतेस येथे सावध करण्यात येते की, सदर मालमत्तासह कोणताही व्यवहार करू नये आणि सदर स्थावर मालमत्तासह व्यवहार केलेला असल्यास त्यांनी बँक ऑफ इंडियाकडे **रू.१,०५,३९,३३७.७६** अधिक त्यावरील व्याज जमा करावे.

**स्थावर मालमत्तेचे वर्णन**

१. फ्लॅट क्र.३०२, ३रा मजला, बी विंग, मातोश्री पार्क कोहौसोलि., भांडुप, बापूसाहेब जुवेलकर मार्ग, भांडुप (पूर्व), मुंबई येथील मालमत्तेचे सर्व भाग व खंड.
२. फ्लॅट क्र.३०१, ३रा मजला, ए विंग, मातोश्री छाया कोहौसोलि., भांडुप, बापूसाहेब जुवेलकर मार्ग, भांडुप (पूर्व), मुंबई येथील मालमत्तेचे सर्व भाग व खंड.
३. गाळा क्र.२, ३, ४ व ५, तळमजला, शेड क्र.१९, अरिहंत कमर्शियल कॉम्पलेक्स, गाव–पूर्णा, तालुका भिवंडी, ठाणे येथील मालमत्तेचे सर्व भाग व खंड.

सही/–
**दिनांक : ०९.०८.२०१६** **प्राधिकृत अधिकारी**
**ठिकाण: मुंबई** **बँक ऑफ इंडिया**



**श्रीनाथ इंडस्ट्रियल इनव्हेस्टमेंट कंपनी लिमिटेड**

**सीआयएन:**एल६५९९०एमएच१९८३पीएलसी२६३३६१
**नोंदणीकृत कार्यालय:** कार्यालय क्र.४०१, ५९७, राजशिया को–ऑप.सोसायटी लि., चिरा बाझार, जे एस एस रोड, मरिन लाईन्स (पूर्व), मुंबई–४००००२.
**ई–मेल:** info@shreenathiic.in **वेबसाईट:** www.shreenathiic.in

**सूचना**

सदस्यांना सूचना देण्यात येत आहे की, कंपनी कायदा २०१३ च्या कलम ११० सहवाचिता कंपनी (व्यवस्थापन व प्रशासन) अधिनियम २०१४ नुसार कंपनीने (अ) ज्या सदस्यांचे ई–मेल डिपॉझिटरी सहभागीदारकडे नोंद आहे त्यांना २९ जुलै, २०१६ रोजी आणि (ब) अन्य सदस्यांना मुद्रांक शुल्क भरलेले स्वपत्ता लिहिलेले व्यवसाय प्रतिसाद लिफाफासह वास्तविक पध्दतीने (ज्यांचे ई–मेल नोंद नाहीत) टपाल मतदान पत्रिकासह टपाल मतदान सूचना वितरणाची प्रक्रिया कंपनीने ६ ऑगस्ट, २०१६ रोजी पूर्ण केलेली आहे. खालील प्रकरणांकरिता विद्युत स्वरूपाने मतदानासह टपाल मतदानाद्वारे कंपनीच्या भागधारकांची मान्यता घेण्यात येणार आहे.

| बाब क्र. | ठरावाचे वर्णन |
|---|---|
| १. | मेमोरॅण्डम ऑफ असोसिएशनमधील मुख्य उद्दिष्ट नियम बदलण्यासाठी विशेष ठराव. |
| २. | मुंबई ते नाशिक असे कंपनीचे नोंदणीकृत कार्यालय स्थलांतरासाठी विशेष ठराव. |
| ३. | कंपनी कायदा २०१३ च्या कलम १८८ अन्वये संबंधीत पक्षकार व्यवहार (आरपीटी) यास मान्यता देण्यासाठी सर्वसाधारण ठराव. |

सदस्यांना ई–वोटिंग सुविधा देण्यासाठी कंपनीने सेन्ट्रल डिपॉझिटरी सर्विसेस (इंडिया) लिमिटेड (सीडीएसएल) ची सेवा नियुक्त केली आहे. सदस्यांनी कृपया नोंद घ्यावी की, दोन्ही पध्दतीने मतदान अर्थात टपाल मतदान व विद्युत पध्दतीने मतदान सोमवार ८ ऑगस्ट, २०१६ रोजी स.९.०० वा. प्रारंभ होईल आणि मंगळवार ६ सप्टेंबर, २०१६ रोजी सायं.५.०० वा. समाप्त होईल.
टपाल मतदान/ई–वोटिंग प्रक्रिया योग्य व पारदर्शकरित्या संचालनाकरिता तपासनीस म्हणून कार्यरत कंपनी सचिव श्री. संदिप दार यांची संचालक मंडळाने नियुक्ती केली आहे. सदस्यांनी कृपया नोंद घ्यावी की, पूर्णपणे भरलेले व स्वाक्षरी केलेले टपाल मतदान पत्रिका तपासनीस यांच्याकडे मंगळवार ६ सप्टेंबर, २०१६ रोजी सायं.५.०० वा. पर्यंत पाठवावेत.
मंगळवार ६ सप्टेंबर, २०१६ रोजी सायं.५.०० वा. नंतर कार्यालयीन वेळ समाप्त झाल्यावर सदस्यांकडून प्राप्त टपाल मतदान पत्रिका वैध समजल्या जाणार नाहीत.
ज्या सदस्यांना टपाल मतदान पत्रिका मिळाल्या नसतील त्यांनी info@shreenathiic.in वर ई–मेल पाठवावा किंवा कंपनीचे निबंधक व भाग हस्तांतरण प्रतिनिधी/कंपनीकडे अर्ज करून दुय्यम टपाल मतदान पत्रिका प्राप्त करावे. टपाल मतदान सूचना आमच्या www.shreenathiic.in वेबसाईटवरून डाउनलोड करता येईल.
टपाल मतदान किंवा विद्युत स्वरूपाने मतदानाबाबत काही प्रश्न/तक्रारी असल्यास सदस्यांनी कृपया संपर्क: श्री.व्ही.बी.शाह, पूर्वा शेअररजिस्ट्री (इंडिया) प्रा.लि., युनिट क्र.९, शिवशक्ति इंड. इस्टेट, जे.आर.बोरिचा मार्ग, कस्तूरबा हॉस्पिटल लेन समोर, लोअर परळ (पूर्व), मुंबई–४०००११, दूर.:०२२–२३०१८२६१ ई–मेल: purvashr@gmail.com

**श्रीनाथ इंडस्ट्रियल इनव्हेस्टमेंट कंपनी लिमिटेडकरिता**
सही/–
**ठिकाण: मुंबई** **हरिष वीराप्पा कांचन**
**दिनांक: ६ ऑगस्ट, २०१६** **अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक**